| | वक्ता | | विषय |
|---|---|---|---|
| १. | गणेश आकाजी गवई | - | वऱ्हाडात ख्रिश्चन मिश्ननने अस्पृश्यांसंबंधी केलेले काम व त्याची मिशनच्या कार्याशी तुलना. |
| २. | बी. एस. कामत | - | गुरुकुलाची आवश्यकता. |
| ३. | सौ. लक्ष्मीबाई रानडे | - | सदर |
| ४. | रा. गोपाळराव देवधर | - | उपदेशकाची जरुरी |
| ५. | रा. केशव रामचंद्र कानिटकर | - | औद्योगिक शिक्षणाची दिशा |
| ६. | रा. भास्करराव जाधव | - | सदर |
| ७. | रा. नाथामहाराज (भंगी पुढारी) | - | सदर |
| ८. | नामदार बाबासाहेब इचलकरंजीकर | - | उद्धाराच्या कामी अस्पृश्यांनी वरिष्ठवर्गाशी मिळूनमिसळून वागावे. यांनी ५०/- रु. देणगी जाहीर केली. |
| ९. | प्रो. गो. चि. भाटे | - | सर्वांस अवश्य शिक्षण द्यावे. |
| १०. | न. चिं. केळकर | - | म्युनिसिपालट्या लोकनियुक्त व्हाव्यात व त्यांत अस्पृश्य प्रतिनिधी असावेत. |
| ११. | रा. आर. जी. प्रधान | - | सदर |

१२. प्रो. हरिभाऊ लिमये - म्युनिसिपालटीत अस्पृश्य प्रतिनिधी येण्याची वाट न पाहता त्यांच्या उन्नतीची सोय करावी.

१३. रा. भास्करराव जाधव - अस्पृश्यांनी सरकारी नोकरीत शिरण्याची आवश्यकता व कोल्हापूर संस्थानांतील प्रयत्न. महाराजांनी हत्तीवर अस्पृश्य माहूत नेमल्याचे उदाहरण.

१४. रा. जोग—इचलकरंजीकरांचे चिटणीस - इचलकरंजी संस्थानांतील प्रयत्न.

१५. रा. वि. रा. शिंदे - मुंबई, पुणे येथे मिशनच्या स्वतःच्या इमारतीची जरुरी.

१६. एल्. बी. नायक - सदर

१७. श्री. महाभागवत (भावी शंकराचार्य) - संस्कृतमध्ये, मिशनच्या धार्मिक प्रयत्नांची योग्यता. हे प्रयत्न समन्वयाच्याच पायावर झाले पाहिजेत. त्याबद्दल मिशनचे आभार.

१८. प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले - वेदोपनिषदांतील उतारे, वेदकाळी अशी अस्पृश्यता नव्हती. हल्लीचे विकृत स्वरूप गेले पाहिजे.

१९. अध्यक्ष भांडारकर - समारोप व रा. वि. रा. शिंदे यांचे आभार.